॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 **NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT** website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र.: रासेयो/२०२४–२५/३८१ दिनांक : १७/०२/२०२५

परिपत्रक

प्रति,
मा.प्राचार्य/रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो.राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय:** भारतीय राज्यघटनेच्या ७५ वर्षपूर्ती निमित्त **"संविधान गौरव महोत्सव"** अंतर्गत फेब्रुवारी २०२५ मध्ये संपुर्ण महिनाभर विविध उपक्रमांचे आयोजन करणे बाबत.

संदर्भ: डॉ. शैलेंद्र देवळाणकर, प्र.शिक्षण संचालक (उ.शि) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे जा.क्र. उशिसं/मवि–१/संविधान गौरव महोत्सव/ई–१०४२८५८, दिनांक १२फेब्रुवारी २०२५ .

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्रान्वय डॉ. शैलेंद्र देवळाणकर, प्र.शिक्षण संचालक (उ.शि) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक २६ जानेवारी १९४९ रोजी भारतीय राज्यघटनेचा मसुदा स्वीकारण्यात आला, या घटनेला २६ नोव्हेंबर २०२४ रोजी ७५ वर्षे पुर्ण झाली आहेत. २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय राज्यघटना अंमलात येऊन २६ जानेवारी २०२५ रोजी या ऐतिहासिक घटनेस ७५ वर्षे पुर्ण झाली आहेत. भारतीय राज्यघटनेने भारताला एक सर्वभौम, लोकशाही प्रजासत्ताक म्हणून स्थापित केले. भारताच्या या ऐतिहासिक परिवर्तनात्मक क्षणाचा सन्मान करण्यासाठी फेब्रुवारी २०२५ मध्ये संपुर्ण महिनाभर खालील प्रमाणे उपक्रम राबवून संविधान गौरव महोत्सव साजरा करण्या बाबत कळविले आहे.

- "भारतीय राज्यघटनेची ओळख" या विषयावर निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करणे.
- भारतीय राज्यघटनेवर प्रश्नमंजुषा आयोजित करणे.
- भारतीय राज्यघटने संदर्भात पोस्टर/भित्तीपत्रके स्पर्धांचे आयोजन करणे.
- राज्य घटनेच्या विविध बाबीं संदर्भात चर्चासत्र, कार्यशाळा, परिषदांचे आयोजन करणे.
- महाविद्यालयांमध्ये राज्य घटनेविषयीचे अभ्यासक, विषयतज्ञ यांना निमंत्रित करून त्यांची व्याख्याने आयोजित करणे.
- राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महाविद्यालयांनी सर्व सामान्यापर्यंत राज्यघटना पोहोचवावी या करिता जनजागृती अभियान राबविणे.
- राज्यातील सर्व सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये राज्यघटने विषयी व्याख्याने आयोजित करणे

तरी त्यानुषंगाने रा.से.यो. संलग्नीत सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात उपरोक्तपणे नमुद केलेल्या विविध उपक्रमांचे फेब्रुवारी २०२५ मध्ये संपुर्ण महिनाभर आयोजन करून **"संविधान गौरव महोत्सव"** साजरा करण्यात यावा व त्याबाबतचा अहवाल पीडीएफ स्वरूपात व हार्ड कॉपी स्वरूपात (एकूण ४ प्रती कलरप्रिंट) सहसंचालक कार्यालयात सादर करण्यात यावा, ही विनंती.

डॉ.मल्लिकार्जुन करजगी
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

**प्रत माहितीस्तव:**

१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. कुलसचिव कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

**प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:**

१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.